पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८१७ /२०१५
दिनांक : ११/१२/२०१५

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **१५/१२/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१५/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७**

दिनांक : **१५/१२/२०१५** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१५/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

विषय क्र.१) मौजे दापोडी भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन,नगरसचिव विभाग यांचेकडील अधिसुचना क्रं. पीसीसी - ३०९६/१८०१/सी.आर-२६१/नवि-२२. दि.११/०९/१९९७ अन्वये शासनाकडुन मंजुर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार दापोडी हे गाव पुणे मनपा मधुन पिं.चि.मनपा मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.मौजे दापेडी येथील स.नं.८५अ पैकी आरक्षण क्र.३/२८ किरकोळ बाजार प्रस्तावित केलेले आहे, सदरचे आरक्षण डि.पी.रिपोर्टनुसार सुमारे १०००.०० चौ.मी.क्षेत्रावर आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव महानगरपालिकेने पाठविला नाही. सद्यस्थितीमध्ये पुणे-मुंबई महामार्गापासुन सांगवी गावाकडे जाणा-या व रेल्वेलाईन फाटकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस भाजी मंडई आहे.सदरचा रस्ता खुपच वर्दळीचा असलेने सदर ठिकाणी रेल्वेलाईनच्या फाटकामुळे ब-याच वेळा अपघात होतात व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तसेच मा.नगरसदस्यांची वारंवार मागणी आहे की मौजे दापोडी येथे भाजी मंडई ( किरकोळ बाजार ) चे आरक्षण विकसित करावे म्हणजे दापोडीमधील नागरिकांना भाजी खरेदीसाठी रेल्वेलाईन वरील फाटक ओलांडुन जाण्याची आवश्यकता भासणार नाही.त्यामुळे आ.क्र.३/२८( किरकोळ बाजार ) चे आरक्षणाची जागा लवकरात ताब्यात घेऊन भाजी मंडई (किरकोळ बाजार ) विकसित करावे. तरी सदरचे आरक्षणाचे जागेचा भुसंपादनाचा प्रस्ताव तयार केलेला असुन सदर भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठवावा लागणार आहे. सदर भुसंपादन पाठविणे कामी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. केंद्र शासनाने “The Right to fair compensation and Transparency in land acquisition ,Rehabilitation Resettlement Act 2013” हा नविन भूसंपादन कायदा तयार केला असून दि.०१/०१/२०१४ पासुन सदरचा कायदा अंमलात आला आहे.तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा अन्वये

संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाअधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

---------



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८१७/२०१५
दिनांक : ११/१२/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.